**सं.फौ.ख. क्र. ११२/२०२२**

**आजरा अर्बन वि. आकाश.**

**MHKO150003462022.**

## <u>निशाणी क्रमांक २७ खालील आदेश.</u>

आरोपीने प्रस्तुतचा अर्ज त्याचा बचाव सिध्द करण्यासाठी तक्रारदार संस्थेच्या निपाणी शाखेचे शाखाधिकारी आणि संचालक यांची साक्ष नोंदवण्यासाठी दिला आहे. आरोपीच्या कथनाप्रमाणे, दि.०४.०५.२०२२ रोजी त्याने धनादेश दिलेला नसल्याची बाब सदर साक्षीदारांच्या उलट तपासातून सिध्द होणारी असल्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**२**. तक्रारदार संस्थेने नि. क्र.२८ प्रमाणे लेखी म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे. तक्रारदार संस्थेच्या कथनाप्रमाणे, आरोपीचा नि. क्र.२६ वरील अर्ज न्यायालयाने नामंजूर केलेला असून सदर साक्षीदारांची साक्ष कोणत्या कारणासाठी नोंदवायची आहे याचा उल्लेख केलेला नसून सा. क्र.२ व ३ यांचा बँकेच्या कागदपत्रांशी संबंध नाही. आरोपीने प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या उद्देशाने प्रस्तूत अर्ज सादर केलेला असल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३**. तक्रारदार व आरोपीच्या वकिलांनी त्यांच्या अर्जातील व लेखी जबाबातील कथनाप्रमाणे युक्तिवाद केला आहे. आरोपीच्या वकिलांनी दि.०१.०२.२०२२ रोजी आरोपीने दिलेल्या लेखी पत्राच्या प्रतिउत्तरात संबंधित संस्थेच्या मुख्याधिकारी वसूली व कायदा विभाग यांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने संबंधित शाखाधिकारी व मुख्याधिकारी वसूली व कायदा विभाग यांची साक्ष नोंदवणे गरजेचे असल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. तक्रारदार संस्थेच्या वकिलांनी, आरोपीने केवळ प्रकरण प्रलंबित ठेवण्यासाठी अर्ज दिलेला असून साक्षीदारांचा दाखल कागदपत्रांशी संबंध नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४**. प्रस्तूत खटला हा आरोपीच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. आरोपीने नि. क्र.२६ प्रमाणे दाखल केलेला अर्ज मागणी केलेल्या साक्षीदारांशी संबंध दाखवण्यास परिपूर्ण नसल्यामुळे नामंजूर करण्यात आला होता. आरोपीने प्रस्तूत अर्जासोबत दि.०१.०२.२०२२ आणि १०.०३.२०२२ च्या पत्राच्या प्रती दाखल केलेल्या आहेत.

त्यावरुन आरोपीच्या अर्जास तक्रारदार संस्थेने त्याचे खाते एन. पी. ए. असल्यामुळे थकबाकीचे ३,२०,०००/– रुपये रक्कम भरणा करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर आरोपीने दाखल केलेल्या नि. क्र.२३ वरील ठरावाच्या प्रतीप्रमाणे संबंधित संस्थेच्या शाखाधिका–यांनी त्याने दिलेल्या कर्जाच्या परतफेडी बाबतचा धनादेश अनादरीत झाल्याचा अहवाल दिलेला आहे. त्यामुळे आरोपीला त्याचा बचाव सिध्द करण्यासाठी संधी देणे न्यायोचित ठरते.

५. आरोपीचा अर्ज मंजूर केल्यामुळे तक्रारदार संस्थेचे कोणतेही नुकसान होणार नाही, याउलट आरोपीचा अर्ज नामंजूर केल्यास त्याचे अपरिमित नुकसान होऊन त्याला बचावाची संधी मिळणार नाही. आरोपीने दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन केवळ त्याने कर्ज घेतलेल्या शाखेचे शाखाधिकारी आणि मुख्याधिकारी– वसूली व कायदा विभाग यांचा सदर प्रकरणाशी व दाखल कागदपत्रांशी संबंध दिसून येत असल्यामुळे प्रस्तूत अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र ठरतो. सबब, न्यायाच्या दृष्टीने हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

## आदेश

१. अर्ज खालील प्रमाणे अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. आरोपीच्या मागणी प्रमाणे तक्रारदार संस्थेच्या शाखाधिकारी, शाखा निपाणी आणि मुख्याधिकारी– वसूली व कायदा विभाग यांना साक्षीसमन्स काढण्यात यावे.

३. आरोपीने आवश्यक असणारे साक्षीशुल्क न्यायालयात जमा करावे अथवा साक्षीदारास हजर झाल्यानंतर प्रत्यक्ष द्यावे.

४. तक्रारदार व आरोपींच्या वकिलांच्या एकमताने पुढील तारीख दि. ०२.०१.२०२६ देण्यात आली आहे.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

जे. ओ. कोड–एम.एच.०२८९७

दिनांक – २३.१२.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.